https://maitri2012.wordpress.com/2016/09/05/%e0%a4%ae%e0%a4%82%e0%a4%a4%e0%a5%8d%e0%a4%b0%e0%a4%aa%e0%a5%81%e0%a4%b7%e0%a5%8d%e0%a4%aa%e0%a4%be%e0%a4%82%e0%a4%9c%e0%a4%b2%e0%a5%80/

मंत्रपुष्पांजली

Posted on सप्टेंबर 5, 2016

प्रा. (कै.) माधव नारायण आचार्य

सप्रेम नमस्कार

आजपासून गणपति-उत्सव चालू झाला. गणपतीची पूजा झाल्यानंतर आपण नेहमी मंत्रपुष्पांजली म्हणतो. पण, त्याचा अर्थ आपल्यापैकी कुणालाच माहीत नसतो. काही वर्षांपूर्वी सुशांत देवळेकरांनी मला अर्थ विचारला. मलाही फारसं काही सांगता येण्यासारखं नव्हतं. आमच्या गावाला (अलिबाग तालुक्यात अलिबागपासून चौदा किमीवर समुद्रकिनारी आमचा चौल नावाचा गाव आहे.) माझे बालमित्र असलेले आणि आता दुर्दैवानं कै. प्रा. माधव नारायण आचार्य ह्यांना

मी नेहमी शंका विचारीत असे. महाभारत, रामायण. उपनिषदं, वेद, संत वाङ्मय, कोणताही विषय असो. शंकांचं उत्तर निश्चित मिळायचंच. दुर्दैवानं आता प्रा. आचार्य आपल्यात नाहीत. ते २६ जून २०१४ रोजी गेले. त्यांच्या निधनानं संतवाङ्मयाच्या अभ्यासकांचा एक फार मोठा मार्गदर्शक विद्वान आपण गमावून बसलो आहोत. संत वाङ्मयाच्या अभ्यासकांत त्यांना खूप मान होता. पण चौलातच राहिल्यामुळं त्यांना म्हणावी तितकी प्रसिद्धी मिळाली नाही. त्यांना स्वतःला त्याचंः काहीच वाटत नसे.

मग मंत्रपुष्पांजलीचा अर्थ काय हे मी आणखी कुणाला विचारणार. त्यांच्यापुढं शंका टाकली. आणि साताठ दिवसांतच त्यांचं उत्तर आलं. आता ते तुम्हा सर्वांना पाठवावं असं सकाळी पूजा करताना डोक्यात आलं त्याप्रमाणं पाठवलं आहे. आता तुम्हालाही मंत्रपुष्पांजली वाहताना अर्थ कळेल. असो. तो लेख, एक संग्राह्य लेख म्हणून जपून ठेवण्यासारखा आहे.

– प्रा. मनोहर रा. राईलकर

षोडशोपचार पूजाविधीतला हा शेवटचा उपचार आहे. त्याचा संदर्भ अर्थ शोधण्याचा हा एक प्रयत्न आहे. प्रथम त्याची संहिता तीन भागांत मांडून घेऊ.

**१) ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्। ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः॥**

**२) राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान् कामकामाय मह्यं। कामेश्वरो वैश्रवणो ददातु॥ कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः।**

**३) ॐ स्वस्ति। साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी स्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात्॥ पृथिव्यै समुद्रपर्यंन्ताया एकराळिति। तदप्येषः श्लोकोभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति॥**

संदर्भ:

१) हा मंत्र वैदिक आहे. ऋग्वेद, मंडल १.१६४.५० व मंडल १०.९०.१६ अथर्ववेद, ७.५.१

२) याचा संदर्भ मिळत नाही. कुबेरवंदनाचा हा भाग बहुतेक भाग (३) मधील मरुत्तस्तवनाचे प्रास्ताविक म्हणून तयार केलेला असावा. [हा (२) भाग मुद्दाम बनवला असावा, असे श्री. रा.शं. नगरकर, पुणे, या संदर्भशोधप्रवीण सन्मित्रांनी मला सांगितले.]

३) हा भाग ऐतरेय ब्राह्मणात येतो. (ऐ.ब्रा. ३९.१) (म.म. पां.वा. काणे यांनी ‘धर्मशास्त्राचा इतिहास’ पूर्वार्ध पृ. ४००, पादटीपेत हा संदर्भ दिला आहे.)

आता काही शब्दार्थांचा विचार करू.

**भाग (१):** पदच्छेदानुसारी अन्वय:

ॐ देवाः यज्ञेन यज्ञं अयजन्त। तानि धर्माणि प्रथमानि आसन्। ते ह महिमानः नाकं सचन्त। यत्र पूर्वे साध्याः देवाः सन्ति।

सायणाचार्यांनी दिलेले काही अर्थ असे –

देवाः व्यवहर्तारो यजमानाः। यज्ञेन निर्मथ्य अग्निना। यज्ञं होमसाधनं आह्वनीयम्। अयजन्त पूजितवन्तः। तानि धर्माणि अग्निसाधनानि कर्माणि। प्रथमानि प्रकृष्टतमानि। आसन् फलप्रसवसमर्थानि अभवन्। नाकः स्वर्गः। महिमानः माहात्म्ययुक्ताः। सचन्त संगताः। यत्र यस्मिन् नाके पूर्वे पूर्वतनाः। साध्याः यज्ञादिसाधनवन्तः।

शब्दार्थांचा अधिक विचार:

येथे देव हेच यज्ञकर्ते. यज्ञ हीच त्यांची क्रिया, यज्ञ करणे ही क्रिया येथे पूजा करणे या अर्थी आहे.

– 'यज्' – हा धातू 'यज्ञ करणे' व पूजा करणे वा आराधना करणे अशा दोन्ही अर्थांनी येतो.

– त्यांचे ते धर्म म्हणजे यज्ञक्रिया. प्रथमानि म्हणजे सर्वोत्कृष्ट म्हणूनच नंतरच्या सर्व धार्मिकांना आदर्श ठरली.

– नाक. अक म्हणजे दुःख हे जेथे नाही तो 'नाक' म्हणून स्वर्ग. तो केवळ सुखमय आहे.

– महिमानः हे त्या यज्ञकर्त्या देवांचे विशेषण. यज्ञक्रियांमुळे ज्यांच्या ठायी विशेष महती राहते असे ते माहात्म्ययुक्त देव.

– सचन्त – याचा 'प्राप्नुवन्ति' असाही अर्थ सायणाचार्यांनी १०.९०.१६ वरील भाष्यात दिला आहे. सच् (उ.) याचा to obtain, to enjoy = असा अर्थ मोनियर कोशात मिळतो. गणाचा उल्लेख नाही.

– पूर्वे = पूर्वतनाः = म्हणजे (ज्या स्वर्गात) जे पूर्वीच पोहोचले होते.

– साध्याः, याचा अर्थ सायणाचार्य 'यज्ञादी (स्वर्गप्राप्तीची) साधने ज्यांच्याजवळ आहेत असे देव' असा करतात. वास्तविक 'साध्य' हा देवांचा एक गण आहे. अमरकोशात आदित्याः, विश्वे, वसवः, तुषिताः,

आभास्वराः, अनिलाः, महाराजिकाः, साध्याः व रुद्राः अशा ९ गणदेवतांचा उल्लेख येतो. (अमर ० १९-२०)

(यांच्याप्रमाणेच विद्याधर, अप्सरा, यक्ष, रक्ष, गंधर्व, किंनर, पिशाच, गुह्यक, सिद्ध व भूत या १० जणांचाही एक वर्ग आहे. हाही देवसंज्ञक मानला जातो. (अमर० २१-२२)

– या दोन्ही वर्गांतील हे देव म्हणजे ‘सामिदेव’ (Demi Gods) आहेत.)

(यज्ञक्रियेमुळे यांना स्वर्लोक मिळतो, हे वाक्य केवळ यज्ञप्रशंसेचे आहे.)

आता ह्या प्रथम भागाचा सरलार्थ मांडून घेऊ. ‘देवांनी यज्ञक्रियाद्वारा यज्ञाची आराधना केली. त्या त्यांच्या यज्ञधर्मक्रिया सर्वोत्कृष्ट/आदर्श होत्या. माहात्म्ययुक्त अशा त्यांना स्वर्ग प्राप्त झाला, जेथे त्या आधीच (पोहोचलेले) साध्य हे देव (निवास करीत) होते.’

**भाग (२):** अन्वय – वयं राजाधिराजाय, प्रसह्य साहिने, वैश्रवणाय नमः कुर्महे। स कामेश्वरः वैश्रवणः कामकामाय मह्यं मे (मम) कामान् ददातु।

काही शब्दार्थ: कुबेर हा विश्रवणाचा मुलगा, म्हणून वैश्रवण.

– प्रसह्य (अव्यय) अत्यंत वेगाने/बलपूर्वक

– साहिने – सह् > साह् (वैदिक) = विजय मिळविणे.

साहिन् > साहिने.

– राजाधिराज – यक्षांचा राजा. याला ‘राजराज’ असेही म्हणतात. (मेघदूत 3)

– कुबेराला येथे कामेश्वर म्हणजे म्हणजे ‘सर्व प्रकारच्या कामना पूर्ण करणारा’/(कामांचा ईश) म्हटले आहे.

– कामकाम = विविध प्रकारच्या इच्छा, कामना असणारा. (कुबेर हा धनपती व धनद. त्याच्या संपन्न सभेचे वर्णन महाभारत सभा० अ. १० मध्ये येते.)

सरलार्थ – आम्ही त्या यक्षराज, बलपूर्वक शत्रूंना जिंकणा-या, वैश्रवण कुबेराला वंदन करतो. सर्व कामना पूर्ण करणारा तो वैश्रवण कुबेर अनंत कामना असणाऱ्या माझ्या सर्व कामना पूर्ण करो. त्या महाराज कुबेराला नमस्कार.

**भाग (३)**: हे मरुत्त राजाला दिलेले आशीर्वचन आहे. मरुत्त हा वैशालीचा प्रसिद्ध राजा. त्याच्या बापाचे नाव अविक्षित. म्हणून त्याला

येथे आविक्षित म्हटले आहे. ऐ.ब्रा. मध्ये त्याच्या पूर्वजाचे कामप्र असे नाव येते. (ऐ.ब्रा. ८.२१.२१ ) त्याचा वंशज म्हणून हा कामप्रि, त्यापासून कामप्रेः (षष्ठी एकवचन) याचे चरित्र महाभारत आश्वमेधिकमध्ये विस्ताराने येते. (अ. ४ ते १०) शिवाय (चित्रशाळा प्रत) शांतिपर्व २९.२२ मध्येही त्याचा उल्लेख येतो. वाल्मीकि रामायण उत्तरकांड सर्ग ८ व भागवत ९.२.२८ मध्येही त्याच्या चरित्राचे काही अंश मिळतात.

– या मरुत्ताने यज्ञ केला. त्यासाठी त्याला जे सुवर्ण हवे होते ते शंकराकडून मिळाले. या संदर्भात महाभारतातील पुढील उल्लेख महत्त्वाचा – (आश्वमेधिक – अ. 8, चित्रशाळा)

– हिमालयाच्या मुंजवान नामक शिखरावर भगवान् शिव नेहमी तपश्चर्या करीत राहतो. या पर्वताच्या चारी बाजूंना सोन्याच्या खाणी आहेत. महात्मा कुबेर आपल्या शस्त्रधारी अनुयायांसह त्यांचे रक्षण करतो. मरुत्ताने शिवाला प्रसन्न करून घेतले व यज्ञासाठी विपुल सोने मिळविले. त्याने मग यज्ञपात्रेही सोन्याची केली. मरुत्ताच्या यज्ञाला बृहस्पती व इंद्र यांचा विरोध होता. परंतु मरुत्ताने त्यांना मंत्रबळावर यज्ञस्थानी आणले. मरुत्ताचा तो श्रीमंत यज्ञ मग संपन्न झाला. देवांनी त्याची स्तुती केली. त्या यज्ञामध्ये काही देवही वाढपी झाले. सर्व देव

सभासद झाले. यज्ञ पूर्ण झाल्यावर शेष धनामुळे मरुत्त संपन्न राजा झाला. चोहो दिशांना त्याचे साम्राज्य पसरले. (आश्वमेधिक. अ. 10) हे वर्णन भाग (3) मधील मरुत्ताच्या यज्ञवर्णनाचीच

छाया आहे. येथील ऐ.ब्रा.मधील श्लोकाचीच छाया भागवत ९.२.२८ मधील पुढील श्लोकार्धावर मिळेल.

मरुतः परिवेष्टारो विश्वे देवाः सभासदः। त्याचप्रमाणे महा० शांति० अ. २९-२२ हा श्लोकही यालाच अनुसरणारा आहे.

आविक्षितस्य वै सत्रे विश्वेदेवाः सभासदः।

मरुतः परिवेष्टारः साध्याश्चासन् महात्मनः॥

येथील परिवेष्टारः या शब्दाचा अर्थ वाढपी असा आहे. (परि + वेष् म्हणजे वाढणे त्यावरूनच हिंदीत परोसना, वाढणे शब्द झाला.)

या भाग (३) च्या आरंभी मरुत्ताच्या विविध प्रकारच्या राज्यप्रकारांचा उल्लेख येतो. साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठय, राज्य व माहाराज्य.

या राज्यप्रकारांसंबंधी म.म.काणे लिहितात, '...या सर्वांचा अर्थ सर्वश्रेष्ठ सत्ता असा असावा. शतपथ ब्राह्मणामध्ये (५.१.१.१३) राजसूय

यज्ञ करणारा राजा होतो व वाजपेय यज्ञ करणारा सम्राट होतो, असे म्हटले आहे. अनेक राज्यांवर अधिराज्य असण्याची कल्पना ऋग्वेदकाळीच ज्ञात होती व ती ऐतरेय व शतपथ ब्राह्मणांच्या रचनेपूर्वीच दृढमूल झाली होती...' (धर्मशास्त्राचा इतिहास – पूर्वार्ध – पृ. ४०१.) परंतु, यांतील काही राज्यप्रकारांचे स्वतंत्रपणे तपासून पाहिलेले कोशगत अर्थ असे आहेत –

भौज्य = सर्व प्रकारच्या भोग्य वस्तूंनी युक्त.

स्वाराज्य = स्वर्गीय सुखांनी युक्त, अनियंत्रित राज्य.

वैराज्य = वैभवाने शोभणारे, विस्तारलेले साम्राज्य.

पारमेष्ठय = सर्वश्रेष्ठ राजपदाने युक्त.

समंतपर्यायी = सर्वव्यापी.

सार्वभौम = संपूर्ण पृथ्वीचा अधिपती.

सार्वायुष = संपूर्ण आयुष्य जगणारा.

सरलार्थ: (त्या मरुत्त राजाचे) कल्याण असो. साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठय, राज्य व माहाराज्य (अशा सर्व प्रकारांचे) स्वामित्व (आधिपत्य) त्याच्याकडे असो. हा मरुत्त राजा,

या टोकापासून त्या टोकापर्यंत पसरलेल्या (आंताद् आपरार्धात्) सर्वव्यापी अशा संपूर्ण पृथ्वीचा आयुष्याच्या अखेरपर्यंत (एकमेव) शास्ता असावा (असो.) समुद्र हीच सीमा असलेल्या पृथ्वीवर त्याचे एकछत्री राज्य असावे. (एकराळ) – अशा प्रकारच्या स्तुतिवचनांनी (श्लोकैः) स्तवन केलेल्या (अभिगीतः) त्या आविक्षित, कामप्रि मरुत्ताच्या घरी मरुद्गण वाढपी म्हणून राहत होते. सर्व देव/विश्वेदेव त्याच्या (यज्ञसभेमध्ये) सभासद झाले होते.

टिपा: (१) पूजेतील षोडशोपचार – आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमनीय, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, अनुलेपन, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, नमस्कार, प्रदक्षिणा व मंत्रपुष्पांजली.

(२) वैदिक धर्मामध्ये यज्ञ आहे, पूजा नाही. पूजा – विशेषत्वाने तीमधील पुष्प, माल्य (माळ), धूप, दीप, गंध, नैवेद्य, प्रसाद इत्यादी विधी हा यक्षसंस्कृतीचा वारसा आहे. याचे विस्तृत विवेचन ‘म.म. वासुदेवशरण अग्रवाल’ यांच्या ‘प्राचीन भारतीय लोकधर्म’ या पुस्तकात मिळते. वैदिकरू + यक्षरू + पौराणिकरू – हा एक व्यापक विषय आहे.

तूर्त इतकेच पुरे.

– प्रा. (कै.)  माधव ना. आचार्य, चौल, जि. रायगड, ४०२ २०३.
प्रेषक : प्रा. मनोहर रा. राईलकर